## प्रकरण दुसरे

## अण्णाभाऊ साठे आणि त्यांचे वाड्.मय

### प्रस्तावना

। एक मानवसमूह दुस-या मानवसमुहाला किती हीन आणि तिरस्कृत लेखतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारतीय समाजात आढळून येणारी अस्पृश्यता होय. शतकानुशतके जो मानवसमूह गुलामगिरीच्या जात्याखाली भरडला जात होता. समाजामध्ये सामुहिक जीवन जगताना माणसाचे काही मूलभूत हक्क आहेत. अधिकार आहेत. ते हक्क अधिकार असल्याशिवाय मानव समाजाची प्रगती किंवा व्यक्तित्वाचा विकास होऊ शकत नाही. या सर्व मानवी मूल्यापासून अस्पृश्य समाज दूर होता. अशा समाजात , वारणेच्या खो-यात १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णाभाऊंचा जन्म झाला आणि तदनंतर साहित्याच्या एका नव्या प्रवाहाला सुरवात झालेली दिसते. ।

अण्णाभाऊंच्या साहित्यरचनेचा प्रवाह प्रथम शाहिरी रचना नंतर कथा व तदनंतर कादंबरी असा आहे. त्यांची वाड्.मय रचना ही आकृतीबंधाच्या दृष्टीने नियममुक्त अशी आहे. त्यामुळे पारंपरिक वाड्.मयबंधाच्या सीमारेषा ओलांडून वास्तवाचे जीवंत दर्शन अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यकृतीतून घडविलेले दिसते. त्यामुळे अण्णाभाऊंचे साहित्य हे समाजपरिवर्तनाचा विचार सांगणारे साहित्य आहे.

अण्णाभाऊंनी समकालाशी बांधिलकी स्वीकारली होती. त्यामुळे त्यांचे साहित्य लेखन हे समकालाचे भान ठेवूनच निर्माण झालेले दिसते. माणुसकीपासून वंचीत राहिलेल्या समाजाचे ते एक घटक होते. त्यामुळे समाजातील विषमतेविरूध्द, अन्यायाविरूध्द बंड करणे हे त्यांच्या साहित्यलेखनाचे उद्दिष्ट दिसते. त्यामुळे जुलूम, जबरदस्ती यांच्या विरोधात जाणारी माणसे आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविलेली दिसतात.

सभोवतालच्या जगाकडे पहाण्याची त्यांची मानवतावादी दृष्टी व तीक्ष्ण आकलनशक्ती यांचे दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते. अण्णाभाऊंनी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॅा. बाबासाहेब आंबेडकर आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्या विचारांशी बांधिलकी स्वीकारली होती. तीच विचारसरणी आपल्या समग्र साहित्यातून आविष्कृत केलेली दिसते. तसेच अण्णाभाऊंची वाङ्.मयसंपदा ही बहुविध स्वरूपाची आहे. यामध्ये वीस कथासंग्रह, तीस कादंब-या, चौदा लोकनाट्ये लावण्या आणि इतर स्फुट रचना अशा स्वरूपाची आहे. यातून त्यांच्या वाङ्.मयीन व्यक्तिमत्वाचा शोध प्रस्तुत प्रकरणातून घेण्याचा हेतू आहे.

१. <u>अण्णाभाऊंची कुलपरंपरा</u>

सर्वसाधारणपणे इसवी सन १८१८ पासून वाटेगांव येथील मातंग समाजातील साठे घराणे स्थाईक असलेले दिसून येते. १८१८ ते १८७३ या काळात अण्णाभाऊंचे पणजोबा " राघोबा" हे वाटेगांवी रहात होते. त्यांना १८४१ साली मुलगा झाला. त्याचे नाव "सिधोजी" असे होते. यांचा कालखंड १८४१ ते १८९९ असा आहे. " सिधोजी "

यांना १८८२ साली मुलगा झाला. त्यांचे नांव " भाऊ " असे होते. " भाऊ " यांचा विवाह वालूबाई नावाच्या एका मुलीशी १९१२ साली झाला. भाऊ आणि वालूबाई यांच्या पोटी अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला. त्यांची इतर आपत्ये पुढील प्रमाणे आहेत.

१. भागुबाई - जन्म १९१८ २. तुकाराम- जन्म १ ऑगस्ट १९२० ३. शंकर- जन्म १९२२ हे बालपणीच वारले. ४. शंकर-जन्म १९२५ क्रमांक तीनचा मुलगा बालपणीच वारल्यामुळे त्याचे स्मरणार्थ तेच नांव पुढे चालविले. ५. जाईबाई-जन्म १९२७. क्रमांक दोन चे आपत्य चिरंजीव " तुकाराम" म्हणजेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होय. यांचा मृत्यू १८ जुलै १९६९ मध्ये झाला. म्हणजे १८१८ ते १९६९ अशी जवळ जवळ दीडशे वर्षे किंवा त्याहूनही अधिक काळ अण्णाभाऊंची कुलपरंपरा दिसते. अण्णाभाऊंचा मुलगा मधुकर साठे आज ही कुलपरंपरा पुढे चालवितो.

## २. अण्णाभाऊंचे छंद :

अण्णाभाऊंचा जन्म एका गरीब कुटुंबात झालेला असला तरी लहानपणापासून अण्णाभाऊंना वेगवेगळे छंद होते. लहानपणी असणारे विविध छंद भावी आयुष्यात थोर साहित्यिक होण्यास कारणीभूत ठरले. निसर्गाच्या सानिध्यात राहून निसर्गाच्या विविधांगी रूपांचे अवलोकन करुन त्या निसर्गाशी समरस होणे. याचे एक विलक्षण वेड अण्णाभाऊंना होते. माणसांच्या गर्दीमध्ये राहण्याची सवय त्यांना नव्हती. अनेक डोंगरदऱ्यामध्ये फिरून नद्यांचे उगम, सरोवरे, जंगले, गुहा हे सर्व पहात असतांना पायवाटेने ते कधी जात नसत. शिकार करणे. दांडपट्टा खेळणे, कुऱ्हाड चालविणे, गाई-म्हैशींच्या झुंजी लावणे आणि जनावरांच्या पाठीवर बसून डोहामध्ये दूरवर जाणे

याचे वेड त्यांना होते. खेडयामध्ये असणा-या अनेक यात्रा-जत्रांना हजर राहून तेथील दुकाने, कुस्त्या, डोंबा-याचे खेळ, पालख्यांच्या मिरवणुका, मुरळयांचे नाच, पोवाडे आणि तमाशे यानी त्यांचे मन आकर्षून घेतले. त्यामुळे भावी काळातील यशस्वी लोकशाहीर होण्यास याच कालखंडात बीजे रुजली जात होती असे दिसते.

१९३२ ते १९३६ या काळात अण्णाभाऊंच्या छंदामध्ये आणखी भर पडली. लोकगीते पाठ करणे. ( अर्थात दुसरे लोक म्हणत असताना ते स्वत: लक्ष देवून ऐकत असत. ) ती टिपेच्या आवाजात गाऊन दाखविणे, पोवाडे, लावण्या पाठ करणे, वृध्द मंडळींच्याकडून विविध शौर्यकथा, शिकारकथा, दंतकथा, आख्यायिका ऐकणे आणि त्या इतरांना तन्मयतेने सांगणे अशा स्वरूपाचे काही छंद त्यांना लहानपणापासूनच जडले होते. त्यामुळे शाहीर आणि ग्रामीण-दलित लेखक म्हणून त्यांची जडण घडण लहानपणापासूनच होत होती. असे दिसते.

३. अण्णाभाऊंचे शैक्षणिक जीवन :

भाऊ साठे आपल्या उदरनिर्वाहासाठी मुंबईला असताना तेथील लोकांची जीवन जगण्याची पध्दती आणि राहणीमान पाहून आपल्याही मुलांनी शिकावे. अशी त्यांची प्रबळ इच्छा निर्माण झाली. दुस-याकडून पत्र लिहून घेऊन त्यांनी वाटेगावी वालूबाईच्याकडे पाठविले. वडिलांच्या या तगादयाने अण्णाभाऊंनी शाळे प्रवेश केला हा काळ म्हणजे सन १९२८-२९ च्या दरम्यानचा असून त्यावेळी वाटेगांव औंध संस्थानात होते. तेथे दलितांच्या मुलांसाठी वेगळया शाळा असायच्या. सवर्णांच्या शाळेच्या व्हरांडयात किंवा एखाधा झाडाखाली दलितांच्या मुलांची शाळा भरत होती. अण्णाभाऊंनी शाळेत प्रवेश केल्यानंतर केवळ एक

दोन दिवसातच शिक्षकांच्याबरोबर मतभेद निर्माण झाले. आणि शाळेला कायमचा पूर्णविराम दिला आणि ते मुंबईला निघून गेले.

पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईला प्रयाण केल्यानंतर अनेक कष्टाची कामे करीत. यावेळी मुंबईमध्ये वरळी भागात " ज्ञानदेव " नावाच्या चुलत भावाशी त्यांची गाठभेट झाली. ज्ञानदेवाने अण्णाभाऊंची पूर्णपणे विचारपूस केली. आणि त्याला आपल्या घरी नेले. ज्ञानदेवांच्या घरामध्ये रामायण, महाभारत सारखे ग्रंथ, पोथ्या इत्यादींचा संचय होता. हे सर्व पाहून अण्णाभाऊंच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. काही दिवसानंतर अण्णाभाऊ दररोज ज्ञानदेवाच्या घरी जाऊ लागले. ज्ञानदेव अण्णाभाऊंना ग्रंथामधील मतितार्थ वाचून सांगू लागले. याचवेळी आपण निरक्षर आहोत. याची मनस्वी खंत अण्णाभाऊंना वाटू लागली. " ज्ञानदेवाजवळ बसून रामायण, महाभारताच्या त्या पोथ्या पाठ झाल्या होत्या. पुढे पुढे ज्ञानदेवाने अण्णाभाऊस अक्षर ओळख करुन दिली: "[१] त्यामुळे अण्णाभाऊ साक्षर होण्यास ज्ञानदेवाचा वाटा मोठा आहे. तेथून पुढे अण्णाभाऊंना वाचण्याचा छंदच लागला. अनेक अशाप्रकारची वर्तमानपत्रे, साप्ताहिके ते दररोज वाचत. मुंबईमध्ये होणाऱ्या चळवळी याविषयीच्या वृत्तांत वाचून अण्णाभाऊ चळवळीकडे आकर्षित झाले आणि पुढे कम्युनिस्ट विचार सरणीचा पुरस्कार करुन कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले.

## ४. कम्युनिस्ट विचारसरणीचे अनुयायी :

अण्णाभाऊ ज्यावेळी १५-१६ वर्षाचे होते. त्यावेळी तत्कालीन समाजामध्ये घडणाऱ्या घटना आणि घडामोडी यांची जाणीव अण्णाभाऊंना अगदी सहजतेने होत होती. या काळात अण्णाभाऊ ज्या समाजामध्ये वावरत होते. त्या समाजामध्ये दोन स्तर होते. एक आपल्याच मातंग समजातीतील असंख्य पोरवयातील तरुण मुले पोट भरण्यासाठी चोरीदरोडयांची कामे करीत होती. तर दुसरे परिस्थिती थोडी बऱ्यापैकी...........

असणारी मुले स्वातंत्र्य मिळविण्याच्या लालसेने स्वातंत्र्य चळवळीत काम करीत होती. " यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, बेर्डे गुरुजी, पांडू मास्तर, आत्माराम पाटील, ईश्वर बापू यांच्या नेतृत्वाने भारलेली धन्वंतरी दादा, बाबू चौकीवाले, नागनाथ नायकवडी, जी. डी. लाड, वसंतदादा पाटील, धोंडीराम माळी, रावसो कळके, अशी असंख्य तरुण मुले राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अग्नीकुंडात बेदरकारपणे उडया घेत होती."[2] या चळवळीत कार्य कारणा-या तरुणांच्या कार्याचा प्रभाव अण्णाभाऊंच्या मनावर झाला.

दरम्यान मुंबईच्या कामगार वस्तीमध्ये होणारे संप, हरताळ, मोर्चे यांचे परिणाम अण्णाभाऊंच्या मनावर होत होते. अण्णा छोटी छोटी कामे करुन साठे कुटुंबाला हातभार लावीत होते. कामासाठी सतत बाहेर फिरावे लागत असल्यामुळे त्यांचे मन मुंबईमधील दोन गोष्टींनी आकर्षून घेतले. " एक विविध राजकीय संघटना आणि दोन मुंबईत चालणारे मुक चित्रपट"[3] यामध्ये " काळा पहाड" " बासरीवाला" " कनककांता" असे चित्रपट व माधव काळे, मा. विठ्ठल गणपत बकरे अशा कलाकारांनी त्यांच्या मनावर खूप मोठा प्रभाव पाडला."[4] आणि यावेळेपासूनच ते विविध ठिकाणच्या चर्चा ऐकण्यात रस घेऊ लागले.

तत्कालीन काळ हा भारतीय राजकारणातला धामधुमीचा काळ होता. महात्मा गांधी, बॅरिस्टर सावरकर, बॅरिस्टर जीना, डॅा. बाबासाहेब आंबेडकर, सेनापती बापट, अच्युतराव पटवर्धन, कॅा. श्रीपाद अमृत डांगे, असे विविध राजकीय विचारसरणीचे प्रवक्ते मुंबईला आपले कार्यक्षेत्र मानून लोकांच्या मनामध्ये आपले तत्वज्ञान रुजविण्याचा प्रयत्न करीत होते. अनेक तरुण उमदी पोरे उत्साहाने आणि हिरीरीने कुठल्या ना कुठल्या संघटनेचे कार्य करीत होती. सर्वांच्या समोर ब्रिटीशांना हाकलणे हेच ध्येय होते. कार्य करण्याच्या या प्रत्येक संघटनेच्या पध्दतीमध्ये फरक होता. प्रचाराची साधने, माणसांचा दर्जा यावरही कोणत्या विभागात कोणती विचारसरणी रुजणार हे अवलंबून असायचे. उपाशी माणसांना

कार्लमार्क्सचे साम्यवादी विचार पट्कन पटतात. रुजतात. तो त्या विचारसरणीचा पाईक बनतो. हाच अनुभव अण्णाभाऊंच्या बाबतीत आला. आणि तारुण्याच्या उंबरठयावर उभा राहण्यापूर्वीच अण्णा कम्युनिस्ट विचारसरणीचे अनुयायी बनले.

अण्णाभाऊंनी कम्युनिस्ट विचारसरणीचा स्वीकार केल्यामुळे ते तरुण कामगारांच्या वर्तुळात लोकप्रिय झाले. अण्णाभाऊ हे कुशाग्र आणि तल्लख बुध्दीचे असल्यामुळे आपले म्हणणे लोकांच्या मनावर तत्क्षणी रुजवू लागले. हे करीत असतांना सनातनी विचार परंपरेला मूठमाती आणि पुरोगामी विचाराचा पाठपुरावा आग्रहाने त्यांनी केलेला दिसतो.

कामगारांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे मालक-भांड-वलदार लोक सर्वसामान्य लोकांना कसे लुबाडतात याची जाणीव करुन देणे. जातीव्यवस्थेच्या कठीण बंधनामुळे सर्वसामान्य तळागाळातील लोकांना आपले जीवन कठने कसे हलाखीचे झाले आहे. याची जाणीव करुन देऊन त्यांची अस्मिता जागृत करणे हे कार्य अण्णाभाऊंनी कम्युनिस्ट चळवळीमार्फत जोमदारपणे सुरु केले. यासाठी विविध स्वरुपाची गाणी, लोकनाटये, लावण्या, पोवाडे, यांच्यामधून प्रबोधनाचे कार्य सुरु केलेले दिसते.

## ५. वाङ्मयीन दृष्टिकोण व प्रेरणा

कम्युनिस्ट पार्टीने जोपासलेल्या जीवन विषयक दृष्टिकोनाचा आणि साहित्य-विचाराचा अण्णाभाऊंच्या मनावर परिणाम झालेला दिसतो. तसेच महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबे-डकर यांच्या वैचारिक प्रेरणेचाही प्रभाव अण्णाभाऊंच्या मनावर झालेला दिसतो. कम्युनिस्ट पक्ष हा सर्वसामान्य कामगार आणि दलितांच्या

कैवाराचा पक्ष आहे. तो गतिशील, पुरोगामी आणि बदलत्या काळाप्रमाणे नवीन मूल्यांचा स्वीकार करणारा परिवर्तनवादी पक्ष आहे. त्यामुळे अण्णाभाऊंनी याचा जोरदार पुरस्कार केला.

" १९३४ मध्ये झालेल्या मुंबई गिरणीकामगारांच्या सार्वत्रिक संपाच्या वेळेस ते प्रथम लालबावटयाच्या चळवळीकडे आकर्षित झाले. हा संप २३ एप्रिलला म्हणजे परशुराम जाधवाच्या स्मृतीदिनाच्या दिवशी सुरु झाला आणि १९३४ च्या संपात त्यांनी धडाडीने भाग घेतला. यावेळी कॉ. साळवी व कॉ. मोरे वगैरे लालबावटा पार्टीतील कार्यकर्त्यांच्या सहवासात ते आले. यावेळी " लेनिनचे चरित्र " रशियन क्रांतिचा इतिहास" व " कामगार वाङ्मय प्रसारक" मंडळाची इतर सर्व पुस्तके त्यांनी वाचली व त्यावेळी "मुंबई कामगार" हे अतिशय नियमाने वाचत "[५] या सर्व वाचनामुळे अण्णाभाऊंच्या विचारामध्ये क्रांतिकारक बदल घडून आला. पूर्वीचे उपास-तपास करणाऱ्या निष्ठावंत अण्णाभाऊंच्या अभिरूचीमध्ये उलटापालट होऊन धडाडीचे क्रांतिकारक कामगार कार्यकर्ते बनले. कामगार चळवळीला स्वत:चा धर्म समजू लागले. मध्यंतरी वाटेगांवी गेलेले अण्णाभाऊ पुन: १९४२ च्या जुन-जुलैच्या दरम्यान मुंबईला परत आले. हा कालखंड म्हणजे पराक्रमाचा, धामधुमीचा आणि बंडाचा होता. हिटलरने रशियावर केलेल्या लढाईच्या अनेक वार्ता वर्तमानपत्रामधून गजगजत होत्या. आणि या सर्वांचे वाचन करून अण्णाभाऊंची प्रतिभा शीघ्र बनत चालली होती. अशा अवस्थेमध्येच अण्णाभाऊंची लेखनी एक विलक्षण रूप धारण करून चुळबूळ करु लागली. प्रत्येक चळवळीच्या वेळी ते त्या त्या प्रसंगाला धरून गाणी लिहू लागले. या काळात त्यांनी स्फुट अशी शेकडो गाणी लिहिली. ही सर्व गाणी देशभक्तीपर, एखाद्या वीरपुरूषाच्या जीवनांवर, दलितांवर होणाऱ्या अन्यायावर आणि कामगारांच्या व सर्वसामान्य तळागाळातील लोकांच्या जीवनांवर लिहिलेली दिसतात.

अण्णाभाऊंनी आपल्या बुध्दीला पटेल ते सत्य मानून समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या मुल्यांवर आधारलेला वाङ्मयीन दृष्टिकोणाचा पाया निश्चित केला. आणि आपल्या लेखनातून त्यांचा पुरस्कार केला.

१ सर्वसामान्य आणि दलित जनांची दारिद्र्यावर मात करुन जगण्यासाठी चाललेली धडपड हे अण्णाभाऊंच्या संपूर्ण व साहित्याचे मूळकेंद्र आहे. साहित्य हे माणसाच्या अज्ञानाचे उच्चाटन करुन समाजपरिवर्तनासाठी एक अनमोल शस्त्र आहे. अशी त्यांची स्वच्छ भूमिका त्यांच्या साहित्यातून आपल्या प्रत्ययाला येते. यासंदर्भात आपल्या साहित्यलेखनाचे ध्येय स्पष्ट करताना अण्णाभाऊ " वैजयंता" कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात, " जो कलावंत जनतेची कदर करतो. त्याचीच कदर जनता करते. हे मी प्रथम शिकून नंतर लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी, समृध्द व्हावा. इथे समता नांदावी. या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे. अशी मला दररोज स्वप्ने पडत असतात. ती मंगल स्वप्ने पहात पहात मी लिहीत असतो. केवळ कल्पकतेचे कृत्रीम डोळे लावून जीवनांतील सत्य दिसत नसते. ते सत्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्याने सर्व दिसते. पण ते सर्व साहित्यिकाला साथ देत नाही. उलट दगा मात्र देते. माझा असा दावा आहे की ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलितांच्या तळहातावर तरली आहे. त्या दलितांचे जीवन तितक्याच प्रामाणिक हेतूने नि निष्ठेने मी चित्रीत करणार आहे नि करीत आहे".[६]

४ जगण्यासाठी धडपडणाऱ्या माणसांची कर्मकहाणी अण्णाभाऊंच्या सर्वच साहित्यामधून आविष्कृत झालेली दिसते. अण्णाभाऊ हे मार्क्सवादी विचाराचे पाईक असल्यामुळे दलित माणसाला, कामगाराला त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी आपली लेखणी झीजवलेली दिसते. साहित्य आणि मानवी जीवन यांचा अतूट संबंध आहे. म्हणूनच मानवी जीवनाचे समग्र दर्शन त्यांच्या संपूर्ण साहित्यामध्ये विखुरलेले दिसते.

गुलामगिरीच्या, जातीव्यवस्थेच्या चौकटीचा आणि भांडवलशाही-वृत्तीचा पाडाव आणि समता प्रस्थापित करणा-या मुल्यांचे पोषण याची मांडणी अण्णाभाऊंनी मांडली आहे. हे करीत असताना प्रतिगामी प्रवृत्तीचा समाजविघातक तत्वांचा धिक्कार केलेला दिसतो.

अण्णाभाऊ साठे कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते असल्याने त्यापक्षाचा विचार त्यांनी आपल्या साहित्याद्वारा सांगितला. आणि त्यातून लोकांच्या मनावर बोध केला. समाजातील वास्तवाचे चित्रण करणे हे त्यांच्या साहित्याचे उद्दिष्ट असल्याने वाङ्मयाच्या कलात्मकतेकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही. अनुभव जसा आला तसा रोखठोकपणे त्या अनुभवांचे चित्रण त्यांनी साहित्यातून केले. समाजाविषयी त्यांना असलेली सहानुभूती, समाजविकासाची त्यांना असणारी तळमळ त्यांच्या वाङ्मयातून प्रकट झालेली दिसते.

अण्णाभाऊंच्या संपूर्ण साहित्यातील आशय त्यांच्या जीवनानुभूतीतूनच निर्माण झालेला आहे. त्यांच्या साहित्यातील सर्वच पात्रे एक ना एक दिवस स्वत: पाहिली आहेत. जन्मत:च अस्पृश्यतेचं ओझे घेऊन या भूतलावर अवतरल्यामुळे अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रय, त्यांच्या पाचवीलाच पुजले होते. या दाहक वास्तवाला ते सामोरे जात होते. त्यामुळे या कडवट अनुभवातून निर्माण झालेली साहित्यनिर्मिती ही अव्वल दर्जाची आहे.

एकूणच अण्णाभाऊंच्या मनावर मार्क्सवादी वैचारिक प्रेरणेचा आणि अनेक राजकीय चळवळींचा झालेला परिणाम, दलित म्हणून जगण्यासाठी झालेला जीवाचा आटापिटा, अस्पृश्य म्हणून समाजामध्ये मिळणारी हीन वागणूक या सर्व गोष्टी स्वत: अनुभवल्या असल्यामुळे एका आंत:रिक उर्मीतून अण्णाभाऊंचे लेखन झालेले दिसते. सर्व सामान्य जनता, त्यांचे दु:ख दैन्य व दारिद्रयावर मात करण्यासाठी चाललेली धडपड हीच अण्णाभाऊंच्या लेखनाची प्रेरणा ठरलेली दिसते.

## ६. अण्णाभाऊंची शाहिरी रचना

अण्णाभाऊंच्या एकूण साहित्यरचनेत प्रथम त्यांनी शाहिरी रचनेस सुरवात केलेली दिसते. सर्वसाधारणपणे १९४२ पासून त्यांनी आपल्या शाहिरी लिखाणाला प्रारंभ केलेला दिसून येतो.

१९४२ च्या अखेरे शाहीर द. ना. गव्हाणकर, व शाहीर अमरशेख हे मुंबईत आले. त्यानंतर अण्णाभाऊंचा त्यांच्याशी परिचय झाला. शाहीर द. ना. गव्हाणकर, अमरशेख आणि अण्णाभाऊ अशी ही तीन अनमोल रत्ने कम्युनिष्ट पार्टीला लाभली. कम्युनिस्ट पार्टीने या तिघांना एकत्र करून त्यांच्या अडीअडचणी दूर करून त्यांची सर्व जबाबदारी आपल्या शीरावर घेतली. शाहीर अण्णाभाऊ साठे गव्हाणकर, आणि अमरशेख यांनी आपले नऊ-दहा माणसांचे एक पथक तयार करून त्या पथकाला " लालबावटा कलापथक " असे नाव दिले. हे पथक १९४५-४६ च्या दरम्यान स्थापन केले. आणि पुढे प्रबोधनाचे कार्य करण्यास समर्थ ठरलेले दिसते.

अण्णाभाऊंनी केलेली शाहिरी रचना ही सामान्य जनता, दलित समाज व कामगार यांचा कैवार घेऊन साकारलेली आहे. सामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण करणे, अन्यायाविरूध्द चीड निर्माण करणे हे अण्णाभाऊंच्या शाहिरी रचनेचे विशेष आहेत.

### पोवाडा :

अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरी रचनेची सुरवात पोवाड्यापासून केलेली दिसते. त्यांची सिध्दहस्त लेखनी " पोवाडे " या वाङ्‌मयप्रकारातही एक वेगळे रूप धारण करून रसिकमनावर विराजमान झालेली दिसते. अशा या पोवाड्यामधूनच त्यांनी सर्वसामान्य जनांची व कामगारांची दुःखे वेशीवर टांगून मुंबईच्या गिरणी कामगारांची होणारी अमानुष

पिळवणूक चव्हाटयावर आणली व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. असे सर्व विषय पोवाडयाच्या आशयासाठी निवडून पोवाडा हया वाङ्‌मय प्रकाराला नवा आशय दिला.

त्यांची मतप्रणाली मार्क्सवादी असो, शेतकरी कामगार पक्षाची असो किंवा अन्य कोणत्याही राजकीय संघटनेची असली तरी पोवाडेकार म्हणून मराठी साहित्याच्या प्रांगणात त्यांना मानाचे स्थान आहे यात तिळमात्र शंका नाही.

त्यांच्या एकूण पूर्णावस्थेतील पोवाडयांची संख्या अकरा आहे. यामध्ये " स्तलिनग्राडचा पोवाडा" " बर्लिनचा पोवाडा" "बंगालची हाक" " पंजाब दिल्लीचा दंगा" " तेलंगणाचा संग्राम" " अमळनेरचे अमर हुतात्मे " " महाराष्ट्राची परंपरा" " मुंबईचा कामगार ", आणि " काळया बाजाराचा पोवाडा" असे पोवाडे लिहिले आहेत. याशिवाय " स्पेनचा पोवाडा " आणि " नानकिंग नगरापुढे " हे अण्णाभाऊंनी लिहिलेले पोवाडे आज उपलब्ध नाहीत.

या सर्वत्र पोवाडयामधून वीरांच्या पराक्रमाचे रोमहर्षक वर्णन, दलित, पिडीत आणि उपेक्षितांच्या दुःखाची गाथा, गरीब -श्रीमंताच्या वर्गसंघर्षांमधून निर्माण झालेल्या विविध समस्यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. अण्णाभाऊंनी पोवाडा हा वाङ्‌मय प्रकार डोळसपणे निवडला. व लोकजागृती घडवून आणली. लोकजागृती व मनोरंजन करीत करीत प्रबोधनाचे कार्य त्यांनी आपल्या शाहिरी रचनेमधून केले.

लावणी :

अण्णाभाऊंनी निव्वळ पोवाडेच लिहिले नाहीत. तर अखिल महाराष्ट्राला वेड लावणाऱ्या लावण्याही लिहिल्या आहेत. लोकनाटयातील कथानक आणि कथानकाला प्रसंगानुरूप लावणी यांची कलात्मक गुंफन केली आहे. त्यामुळे त्यांच्या स्वतंत्र अशा फारच थोडया

लावण्या आढळतात. सुगी, माझी मैना गावावर राहिली, आणि मुंबईची लावणी ह्या त्यांच्या रचना अत्यंत लोकप्रिय आहेत.

" माझी मैना गावावर राहिली " ही लावणी म्हणजे अण्णाभाऊंच्या हृदयस्पर्शी प्रतिभेचे कोरीव लेणेच आहे. ही लावणी छक्कड आहे. छक्कडमध्ये लेखनविषयाचा एक भाग सलग सहा ओळीमध्ये लिहिलेला असतो. मुंबईचा श्रमजीवी कामगार, त्यांची भाववेडी पत्नी, मैना, या मैनेपासून भांडवलशाही व्यवस्थेमुळे त्यांची झालेली ताटातूट, याचे चित्रण या लावणीत आहे.

पारंपरिक लावणी आणि अण्णाभाऊंची लावणी, याचा विचार करता दोन्हींचा घाट एकच आहे. पण आशयात मात्र अण्णाभाऊंनी प्रचंड प्रमाणात बदल केलेला दिसतो. पारंपरिक लावणी ही आशुक-माशुकांच्यावर आधारित प्रेम विरह इत्यादी गुणांनी युक्त आहे. पण अण्णाभाऊंची लावणी ही लौकीक आहे. पण तत्कालीन वास्तवाशी समरस झाल्यामुळे समाजजीवनाचा उत्कट आविष्कार त्यांच्या लावणीतून पहावयास मिळतो.

## लोकनाटये :

पारंपरिक तमाशातील काही वैशिष्टये स्वीकारून अण्णाभाऊंनी लोकनाटयांची निर्मिती केलेली दिसते. पारंपरिक रंजनप्रधान तमाशात गण, गौळण, लावणी, बतावणी आणि वग असे प्रमुख घटक होते. अण्णाभाऊंनी लोकनाटयामध्ये हे घटक स्वीकारले पण त्यांच्या आशया-मध्ये मात्र आमुलाग्र बदल केला.

अण्णाभाऊंनी लोकनाटयाची निर्मिती करताना तमाशातील राजा, राणी, प्रधान, सेनापती ही कल्पनारंजक पात्रे वगळली. आणि त्यांच्या जागी गावकरी, शेतकरी, श्रमिक, पाटील, पुढारी व राजकीय नेते

अशी वास्तव जीवनांतील पात्रे आणलेली दिसतात. शोषण करणारा आणि त्याला बळी पडणारा यांच्यातील संघर्ष, काळाबाजार, अन्नधान्यटंचाई, महागाई, दैन्य, दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणा तसेच मतदान आणि निवडणुका असे प्रचलित विषय त्यांच्या बहुतांशी लोकनाटयात आलेले दिसतात.

अण्णाभाऊंच्या लोकनाटयाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे पारंपरिक तमाशातील " सोंगाडया" या पात्राला फाटा देऊन त्याठिकाणी वर्गजागृत " धोंडया" या नव्या पात्राची निर्मिती केलेली दिसते.

अण्णाभाऊंनी एकूण चौदा लोकनाटये लिहिली आहेत. यामध्ये " अकलेची गोष्ट" " खाप-या चोर" " देशभक्त घोटाळे" "शेठजीचे इलेक्शन" " बेकायदेशीर" " माझी मुंबई " " मूक मिरवणूक " लोकमंत्र्याचा दौरा", " पुढारी मिळाला;" " पेंग्याचे लग्न", "दुकाळात तेरावा" " बिलदंर बुडवे" अशी त्यांच्या नावांवर आज बारा लोकनाटये उपलब्ध आहेत. तसेच " निवडणुकीत घोटाळे " हे लोकनाटय आज उपलब्ध नाही व " राजा संग्रामसिंह " हे लोकनाटय अण्णाभाऊंच्या नावांवर दाखविले जात असले तरी वस्तुत: ते द. ना. गव्हाणकर, यानी लिहिलेले लोकनाटय आहे. अशी एकूण अण्णाभाऊंच्या नावांवर बारा लोकनाटये आज उपलब्ध आहेत.

वरील सर्व लोकनाटयातील बरीचशी लोकनाटये अत्यंत प्रभावी आहेत. साधारणपणे अण्णाभाऊंनी १९४५ ते १९५२ याकाळात ही लोकनाटये लिहिली. व स्वत:च सादर करून जनतेचे रंजन आणि प्रबोधन केले. ही लोकनाटये काळाची गरज म्हणून लिहिलेली असली तरी त्यामध्ये गरीबांबद्दलचा जिव्हाळा दिसतो. कामगारकिसानांची धनदांडग्याकडून होणारी पिळवणूक व त्याविरूध्द संघर्ष निर्माण करणे हा हेतू असलेला दिसतो.

७. अण्णाभाऊंची कथा :

अण्णाभाऊ साठे यांनी १९५० च्या दरम्यान कथालेखनास प्रारंभ केलेला दिसतो. याच काळात मराठीत नवकथा निर्माण होत होत्या. त्या कथेचा प्रभावही होता. पण त्याचा कोणताही परिणाम अण्णाभाऊंच्या कथेवर झालेला दिसत नाही. याच काळात वि. स. खांडेकर आपल्या कथेतून दीनदलितांविषयीचा कळवळा मांडत होते. ग. त्र्यं. माडखोलकरही कथेतून दलितविषयीची सहानुभूती अभिव्यक्त करीत होते. श्री. म. माटे यांच्या " उपेक्षितांचे अंतरंग " मधून दलितांच्या वेदनांचे वास्तव मांडत होते. पण या सा-या लेखनामागे सहानुभूतीचा भाग अधिक होता. अण्णाभाऊंचे कथा लेखन या पार्श्वभूमीवर सुरु झाले.

अण्णाभाऊंच्या कथानिर्मितीची पार्श्वभूमी ते ज्या मातंग समाजात जन्माला आले. त्या समाजाच्या चातुःवर्ण्यव्यवस्थेतील अमानुषतेतून व दुःखभोगातून सजलेली दिसते. अण्णाभाऊंच्या कथेचा पिंड हा त्यांच्या स्वानुभवातून सजलेला दिसतो. शैलीचे आविष्कार साधण्यासाठी त्यांनी कथा लिहिली नाही. किंवा कथेच्या आकाराचे तांत्रिक व कलात्मक प्रयोग करण्यासाठीही त्यांनी आपली कथा लिहिली नाही. तर त्यांचे कथालेखन हे त्यांच्या जीवनानुभूतीच्या अपरिहार्यतेतून आविष्कृत झालेले दिसून येते. यासंदर्भात स्वतः अण्णाभाऊ " बरबाधा कंजारी" या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, " माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात व जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज आणि त्याचं यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रूप करणे मला आवडत नाही. नव्हे मला भिती वाटते.....माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करु नये. असं माझं मत आहे.....मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख

लावून भरारी मारता येत नाही. त्या बाबतीत मी स्वत:ला बेडूक समजतो.....माझी सारी पात्रे या ना त्या नात्याने माझ्या आयुष्यात येऊन गेलेली आहेत.....माझी माणसं ही वास्तव आहेत. जिवंत आहेत. ......त्यांच्या गुणावगुणांचा चर्चा मी करीत नाही. ते कार्य मराठी जनता आणि तिचे थोर विद्वान करतील अशी माझी आशा आहे." [७]

अण्णाभाऊंनी आपल्या कथालेखनास १९५० पासून प्रारंभ केलेला दिसून येतो. त्यांचा पहिला कथासंग्रह " खुळवाडी " हा १९५७ साली ऑगस्ट महिण्यात प्रकाशित झाला. यापूर्वी त्यांच्या अनेक कथा निरनिराळ्या मासिकांतून व साप्ताहिकांत प्रकाशित झालेल्या दिसतात.

" बरबाद्या कंजारी " १९६०, " आबी " १९६१, "कृष्णाकाठच्या कथा १९६२, तसेच " भानामती " " लाडी " " गजाआड" "चिराग-नगरची भुतं " " जिवंत काडतूस " " ठासलेल्या बंदूका" " गु-हाळ " " नवती " " निखारा" " राम-रावण युध्द", " भुताचा मळा " "रानवेली " " वणव्याची काडी", " सातारी काडतूस" "भोमक्या आणि इतर कथा" हे त्यांचे कथासंग्रह आहेत. इतर सर्व कथासंग्रह १९६२ ते १९६९ दरम्यानचे आहेत असे त्यांचे एकूण वीस कथासंग्रह प्रकाशित झालेले दिसून येतात.

अण्णाभाऊंनी या सर्वच कथासंग्रहातील कथामधून वारणाखो-यातील परिसर तेथील माती आणि त्या मातीसी समरस झालेली माणसं, त्यांच्या चालीरिती, रुढी, रिवाज परंपरा, अंधश्रध्दा या सा-या गोष्टींचे वर्णन मोठ्या उत्कटतेने आणि रसिकतेने केलेले दिसते. तळागाळातील लोकांच्या भावभावनांचे, दु:खाचे, आकांक्षांचे चित्रण अण्णाभाऊंनी मराठी ग्रामीण कथेत केले. या सर्व कथांमधील पात्रे ही अन्यायाविरुध्द प्रतिकार करणारी आहेत.

अण्णाभाऊंच्या कथांमधून लढयाचे नवे दर्शन घडते. यातून अण्णा-भाऊंचा साम्यवादी दृष्टिकोण व्यक्त झालेला दिसून येतो. सामान्यजनांना अन्यायाच्या प्रतिकारासाठी प्रवृत्त करणे. हा अण्णाभाऊंच्या कथा-

लेखनामागील उद्देश आहे. अण्णाभाऊंच्या कथांच्या संदर्भात प्र. श्री. नेरुरकर म्हणतात, " अण्णाभाऊंची समाजाशी निरंतर बांधणूक व निष्कलंक निष्ठा असल्यामुळे त्यांची कथा जीवनवास्तवाच्या धगीपासून दूर पळून जात नाही. भलत्याच काल्पनिकतेमध्ये व स्वच्छंदतेमध्ये ती आपला विकास व विलास करु इच्छित नाही. तिची मानवधिष्ठित भूमिका आणि तत्वज्ञानात्मक आंतरिकता संतसाहित्यातून शाहिरी कवनातून मार्क्सवादाची जी ओळख त्यांना होत गेली. त्यातून त्यांच्या एका कथेत येणाऱ्या नागफणीसारखीच फणा उभारुन सुस्पष्ट व सुसंगत अशी उभी राहिलेली दिसते. लोकजीवनांत जे अनिष्ठ आहे, अन्याय्य आहे. अमानुष व दांभिक आहे. त्यावर त्याचा हल्ला हा त्यांच्या कथांतून छुपेपणाने न होता. उघडपणेच होतो. आणि तरीही मूलभूत अशी त्यांच्या कथेची, तिच्या कथास्वरूपाची व कथारचनेची व कथासौंदर्याची कलात्मकता कुठेही हिणकस वा उपरी ठरत नाही"[८] तसेच बाबुराव गुरव लिहितात," आजच्या मराठी लघुकथेच्या वैशिष्टयपूर्णतेशी अण्णाभाऊंची कथा फटकून उभी राहिली. तरीही लोकमानसात रुजून मराठी वाङ्मयामध्ये तिने आपले स्थान पक्के केलेले दिसते. "[९]

म्हणजेच मराठी कथाविश्वात अण्णाभाऊ साठे यांच्या कथेला एक वेगळे स्थान आहे. तळागाळातील लोकांचे दुःख, दैन्य, दारिद्र्य यांचे अत्यंत तळमळीने चित्रण करणारी ही कथा वैशिष्टयपूर्ण स्वरूपाची आहे.

## ८. अण्णाभाऊंची कादंबरी :

मराठी भाषेतील प्रारंभीच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप बोधवादीच होते. त्यात अद्भुतरम्यता, अतिशयोक्ती अधिक असलेली दिसते. अद्भुतरम्य कादंबऱ्याची परंपरा या काळात बरीच लोकप्रियही झालेली दिसते. यामध्ये हरी केशवजी, बाबा पद्मनजी, बा. कृ. गोखले,

नागेशराव बापट, म. वि. रहाळकर आणि मनोहर पंडीत इत्यादींचा समावेश करता येईल. त्यानंतर मराठी कादंबरीचे रूप बदललेले दिसते. ह. ना. आपटे सारख्या श्रेष्ठ कलावंतानी मराठी कादंबरीच्या विषयात आणि आशयात पूर्ण बदल केला. मुक्तामाला मंजुघोषा या कादंब-यांनी आपला एक विशिष्ट वाचकवर्ग निर्माण केला होता. पण १८५७ मधील " यमुनापर्यटन" कादंबरीपासून सामाजिक कादंब-याची परंपराही निर्माण झालेली होती. अण्णाभाऊ साठे ज्या काळात कादंबरीलेखन करीत होते. तो काळ फडके-खांडेकराच्या भरभराटीचा काळ होता. फडके रंजनप्रधान कादंब-या लिहीत होते. तर खांडेकर एका विशिष्ट ध्येयाने प्रेरीत होऊन लेखन करीत होते. अण्णाभाऊंच्या कादंबरीलेखनात या दोनही प्रवृत्तींचे दर्शन घडते. मात्र " कलेसाठी कला की जीवनासाठी कला" "रंजनवाद श्रेष्ठ की बोधवाद श्रेष्ठ " असा जो वाद त्याकाळी निर्माण झालेला होता. त्या वादाचा विचार न करता अण्णाभाऊ स्वत:च्या प्रेरणानुसार कादंबरीलेखन करीत राहिले. अफाट जनसागरात गुलामगिरीच्या कचाट्यात सापडलेला, दारिद्र्याने गांजलेला, अगतिक झालेला माणूस केंद्रस्थानी मानून कादंबरी लिहित होते. हा माणूस गुलामगिरीची बंधने झुगारुन बाहेर पडतो आहे, संघर्षासाठी तो उभा राहात आहे, तो लढाऊ होत आहे. असे जे अण्णाभाऊंचे स्वप्न होते. त्याचे चित्रण अण्णाभाऊंनी आपल्या कादंब-यातून केले आहे.

त्यांच्या कादंब-या " वारणेच्या खो-यात" " फकिरा" " चित्रा" " माकडीचा माळ" " वैर" " डोळे मोडीत राधा चाले " " रानबोका" " कुरूप " " पाझर" " केवड्याचं कणीस" " अलगुज " " रानगंगा" " संघर्ष " " अहंकार" " रूपा" " आघात" " गुलाम " " मूर्ती " " वैजयंता" " चंदन " " चिखलातील कमळ " " फुलपाखरु " " आवडी " " रत्ना" " वारणेचा वाघ" " मास्तर " " अग्निदिव्य" " तारी " आणि " आग " असे विपुल कादंबरी लेखन अण्णाभाऊ

साठे यांनी केले. अण्णाभाऊंच्या एकूण चाळीस कादंब-या आहेत. असे जरी म्हटले जात असले तरी त्यांच्या नावांवर तीस कादंब-या आढळतात.

जे कर्तबगार आहेत पण मानवाच्या मौल्यवान हक्कापासून दूर आहेत. अशा लोकांच्या जीवनांवर प्रकाशझोत टाकणे. हा त्यांच्या कादंबरी लेखनाचा हेतू आहे. सामान्य माणूस हाच आपल्या कादंबरीचा केंद्रबिंदू ठेवून त्यांनी लेखन केल्यामुळे त्यांच्या कादंब-या सर्व सामान्य लोकांमध्ये अतिशय लोकप्रिय झालेल्या दिसतात. अण्णाभाऊंच्या या कादंबरी लेखनासंदर्भात बाबुराव गुरव लिहितात. "अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचा सगळा प्रवास, आंतरिक तळमळीतून कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा स्वीकार आणि दर्शन, त्यातून जीवनदर्शन त्या सा-यामधून कलामुल्यांचा वेध असा आहे."[१०]

त्यांची कादंबरी मानवतावादी आहे. मानवतावाद त्यांच्या लेखनात भरून उरला आहे. दलित जीवनाच्या अनुभूतीला प्रतिभेची जोड लागल्यामुळे कादंबरीकार म्हणून त्यांना लौकीक मिळाला.

<u>सारांश</u>

अण्णाभाऊंच्या संबंध वाड्.मयीन व्यक्तिमत्वाचा आलेख काढला तर प्रथम शाहीर नंतर कथाकार व तद्नंतर कादंबरीकार असा त्यांच्या लिखानाचा प्रवास दिसून येतो.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अग्रभागी असणारा सारा मराठी माणूस हक्कासाठी न्यायासाठी शोषणाविरूध्द कसा बुलंद आवाज उठवितो. याचे जिवंत चित्रण त्यांच्या शाहिरी रचनेतून घडते. तसेच वाटेगावच्या आणि मराठमोळ्या माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीचे, आचार-विचाराचे आणि अन्यायाविरूध्दच्या बंडाचे दर्शन त्यांच्या कथा भांडारातून घडते व दीनदुबळ्या अनाथ दलितांचा आक्रोश

घरादाराची झालेली होळी आणि माणुसकीला काळीमा फासणा-या अत्याचाराला बळी पडलेला माणूस या सर्वांचे सत्य दर्शन अण्णाभाऊंच्या कादंबरी वाङ्.मयातून होते.

अण्णाभाऊंचे जीवन, साहित्य आणि तत्वज्ञान हे सुटे सुटे करुन आपल्याला पाहता येत नाही. तर याची एक सुरम्य सांगड झालेली दिसून येते. अण्णाभाऊ हे प्रतिभावंत शाहीर, कलाकार लोकनाटयकार, कलापथकांचे चालक अशा विविध नात्यानी मराठी जनते समोर वावरताना दिसतात. जगण्यासाठी धडपडणा-या उपेक्षित सामान्य माणसांची व्यथा, त्यांचे विचार, त्यांचा व्यावसायीक गुंता व एकूणच त्यांच्या जीवनाची होणारी परवड या सर्वांना केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी आपली वाङ्.मय निर्मिती केलेली दिसते.

अण्णाभाऊ साठे यांचे नांव घेताच समोर दिसतो तो लालबावटा, कुणबी सेवा संघ, गिरणीतील श्रमिक, मजूर, भांडवलदार, जाती जमातीमधील प्रेम, तेढ व स्वैर-स्वच्छंद वर्तन करणारी माणसे, जिवापाड जपणारी भारतीय संस्कृती या सर्वांचे जीवंत चित्रण त्यांच्या धारदार लेखनीतून उतरलेले दिसते. अण्णाभाऊंचे जीवन आणि त्यांचे लेखन यामध्ये एक घनिष्ठ संबंध असलेला दिसतो. त्यांनी जीवनभर जपलेल्या निष्ठा आणि त्यांची वैचारिक भूमिका याचे स्पष्ट प्रतिबिंब त्यांच्या विविध-प्रकारच्या लेखनातून प्रकट झालेले दिसते. कलामूल्यांची फारशी दखल न घेता अनुभव जसा आला तसा त्यांनी आपल्या वाङ्.मयातून मांडला हे मांडताना त्यांच्या मनात जे स्वप्न होते. त्याचीही मांडणी काही एक प्रमाणात आपल्या वाङ्.मयातून त्यांनी केलेली आढळते. श्रेष्ठ दर्जाच्या कलाकृतीचे मोल त्यांच्या लेखनाला लाभलेले नसले तरी त्यांच्या वाङ्.मयातून प्रकट होणारी समाजाविषयीची तळमळ उपरी नव्हती. हे स्पष्ट आहे.

संदर्भ-टीपा


१. विटेकर, वि. ब. — असे होते अण्णाभाऊ साठे, छाया प्रकाशन, एरंडवणे, १९८६, पृ. २०.

२. गुरव, बाबुराव — अण्णाभाऊ साठे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९१, पृ.-१४.

३. तत्रैव, — पृ. २२.

४. तत्रैव, — पृ. २५.

५. साठे, अण्णाभाऊ — स्तालिनग्राडचा पोवाडा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रकाशन, ९ मे १९८५, पृ. ४.

६. साठे, अण्णाभाऊ — वैजयंता, मॅजेस्टिक बुक स्टॉल, आवृत्ती ४ थी, १९७८, प्रस्तावना.

७. साठे, अण्णाभाऊ — बरबाद्या कंजारी, विद्यार्थी प्रकाशन, १९६०, प्रस्तावना.

८. नेरुरकर, प्र. श्री. — "लोकराज्य" अण्णाभाऊ साठे, विशेषांक, १ नोव्हेंबर १९९३, पृ. ३०.

९. गुरव, बाबुराव — अण्णाभाऊ साठे, समाजविचार आणि साहित्यविवेचन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९१, पृ. ६५.

१०. तत्रैव, — पृ. ५६.